जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३७३ दिनांक - ११/०९/२०२४**

लोणीकाळभोर पोलीस ठाणे

**अवैधरित्या पेट्रोल/डिझेल चोरी करणा-या टोळीचा पर्दाफाश करुन,**
**४८ लाख ०१ हजार ८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त**

लोणीकाळभोर पोलीस ठाणे हद्दीतील अवैध पेट्रोल डिझेल चोरीचे अनुषंगाने मा.सहा.पोलीस आयुक्त हडपसर विभाग, पुणे शहर यांचे आदेशान्वये दिनांक- १०/०९/२०२४ रोजी सहा.पोलीस निरीक्षक, राजु महानोर, मुंढवा पोलीस स्टेशन, पोलीस अंमलदार ढमढेरे, शिवाजी जाधव असे लोणीकाळभोर पोलीस स्टेशन पुणे शहर हद्दीत पेट्रोल डिझेल चोरीचे गुन्हयांना प्रतिबंधकरणचे अनुषंगाने पेट्रोलींग करीत असताना यांना गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एचपीसीएल व आय. ओ.सी. एल.कपंनी कदम वाकवस्ती ता.हवेली येथुन पेट्रोल व डिझेल भरुन टँकर पेट्रोल पंपाकडे जात असतात त्यावेळी त्यांना एचपीसीएल व आय. ओ.सी.एल.कंपनीकडुन प्रवास करण्याचा मार्ग,वेळ नियोजित केलेली असते. तसेच सदर टँकरमधुन ते टँकर कंपनीच्या बाहेर गेल्यानंतर इंधन बाहेर काढता येवु नये याकरीता टँकरला कंपनीचे लॉक करुन कंपनीचे बाहेर पाठविले जाते. असे असताना, मौजे कुंजीरवाडी थेऊर फाटयाजवळ ता.हवेली जि. पुणे येथील पुणे सोलापुर असा दुतर्फा वाहना-या महामार्गाचे दक्षिणेस रिकाम्या जागेतील पत्र्याच्या शेडजवळ टँकर घेवुन जावुन त्यामधुन पेट्रोल डिझेल या ज्वलनशील इंधन बॅरेल मध्ये काढीत आहे अशी मजकुराची बातमी मिळाल्याने लागलीच वरिष्ठ पोलीस निरीक्षक लोणीकाळभोर पोलीस ठाणे श्री.राजेंद्र करणकोट, यांना कळविले असता, त्यांनी लोणीकाळभोर पोलीस ठाणे कडील तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक अमोल घोडके, व स्टाफ यांना छापा कारवाईचा आशय समजावुन सांगुन कारवाई करण्याचे आदेशित केले.

सदर ठिकाणी आयओसिएल व एचपीसिएल असे एकुण ०३ इंधन टॅकर, त्या टॅकर मधुन इलेक्ट्रिक मोटारीचे साहाय्याने डिझेल बॅरेल मध्ये काढीत असताना मिळुन आले. सदर छापा कारवाईमध्ये एकुण १६२० लिटर डिझेल मिळुन आल्याने जप्त करण्यात आलेले आहे.

सदर घटनेबाबत लोणीकाळभोर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ४४०/२०२४ बी. एन.एस.कलम १११, ११२, ३०३(२), ६१(२), ३१६(३), २८७, २८८स्फोटक पदार्थ अधिनियम १९०८ कलम ३, ४, ५, ६ सह अत्यावश्यक वस्तु अधि. कलम ३,७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरील अवैधरित्या पेट्रोल/डिझेलची चोरी करणारे इसमांची नावे १)शुभम सुशील भगत वय २३ वर्षे, रा.बोरकरवस्ती.थेउुरुफाटा, ता. हवेली जि.पुणे २)तृशांत राजेंद्र सुंभे वय- ३१ वर्षे रा. बॅक ऑफ बडोदाजवळ, थेऊरु फाटा ता. हवेली जि. पुणे ३) रवी केवट वय २५ वर्षे रा. बोरकरवस्ती ,माळीमळा ता. हवेली जि. पुणे, ४) विशाल सुरेश गोसावी वय ३० वर्षे रा वाणीमळा थेऊर फाटा ता. हवेली जि. पुणे ५) किरण हरीभाउ आंबेकर वय ३१ वर्षे रा. कदमावाकवस्ती ता.हवेली जि.पुणे ६) रोहीत कुमार वय २१ वर्षे रा.बोरकरवस्ती माळीमळा ता.हवेली जि. पुणे, नमुद आरोपीना दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली असुन टॅकर मालक पाहिजे आरोपी यांचे सांगणेवरुन पेट्रोल/डिझेलची चोरी करीत असल्याचे सांगितले तसेच दाखल गुन्ह्यात इतर एक पाहिजे आरोपी आहे.

सदरची कामगिरी ही मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रार्देशिक विभाग, पुणे शहर, श्री.मनोज पाटील, मा. पोलीस उप आयुक्त ,परिमंडळ ५, श्री.आर.राजा, मा.पोलीस पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री.निखील पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त हडपसर विभाग, पुणे शहर श्री.अश्विनी राख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोणी काळभोर पो. स्टे. पुणे शहर, श्री.राजेंद्र करणकोट, सहा.पोलीस निरीक्षक, श्री राजु महानोर मुंढवा पोलीस स्टेशन, पोलीस उप निरीक्षक अमोल घोडके, लोणी काळभोर पो. स्टे, पोलीस अंमलदार, रामहरी वणवे, मंगेश नानापुरे, मल्हार ढमढेरे, शिवाजी जाधव, संदीप धुमाळ, बाजीराव विर, योगेश पाटील यांचे पथकाने प्रशंसनीय कामगिरी केलेली आहे.

